RNI No. MAHBIL /2012/47985
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १३, अंक - ०५ ] गुरुवार ते बुधवार, मार्च २१ - २७, २०२४ / चैत्र १ - ७, शके १९४६ [ पृष्ठ ०१

## प्राधिकृत प्रकाशन

**विभागीय आयुक्त यांजकडून**

*महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, (१९५९ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ३) कलम १४५ (१-अ) नुसार*

**आदेश**

क्रमांक विकास/आस्था/ग्रापंअ/९२/२०२४.— सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील ग्रामपंचायत, राहुलनगर (सुलतानपूर) या ग्रामपंचायतीच्या एकूण ०७ सदस्यांपैकी एकूण ०६ सदस्य पदे रिक्त आहेत. ग्रामपंचायतीच्या एकूण सदस्य संख्येच्या निम्याहून अधिक जागा रिक्त झाल्या आहेत. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी ग्रामपंचायत विघटित करणेबाबत शिफारस केलेली आहे. ग्रामपंचायत कार्यकारणीची मुदत दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी संपत आहे.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडील पत्र क्रमांक सा.वि./ग्रा.पं./सं.-१/आरआर-१०२/२०२४, दिनांक १४ फेब्रुवारी २०२४ रोजीचा ग्रामपंचायत विसर्जित करणेबाबतची शिफारस, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडील पत्र क्रमांक जिपसो/साप्रवि/मुलकी-१ व २/ प्र.क्र./कावि-E Tapal/१७९/२०२३, दिनांक १९ ऑक्टोबर २०२३ चे अहवालाचे अवलोकन करून व महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग राजपत्र, दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करून मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४५ (१-अ) अन्वये, मी, डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे माझेसमोर सादर केलेल्या कागदपत्राचे अवलोकन करून हा आदेश शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झालेच्या तारखेपासून, सोलापूर जिल्ह्यातील तालुका माढा येथील ग्रामपंचायत राहुलनगर (सुलतानपूर) विघटित करणेबाबत आदेश देत आहे.

**डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार** (भा.प्र.से.),
विभागीय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे.

पुणे, ४ मार्च २०२४.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.